सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १८० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राहुल म्हणाले-पिक्चर अभी बाकी है...

### फक्त एका नव्हे तर अनेक जागांच्या मतदार यादीत तफावत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**



काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी मंगळवारी सांगितले की, फक्त एक जागा नाही तर अनेक जागा आहेत जिथे मतदार याद्यांमध्ये छेडछाड केली जात आहे. हे राष्ट्रीय पातळीवर पद्धतशीरपणे केले जात आहे.

बिहारच्या अद्ययावत मतदार यादीत १२४ वर्षीय 'पहिल्यांदाच मतदार' झालेल्या मिंता देवीच्या प्रश्नावर राहुल म्हणाले- हो, मी त्यांच्याबद्दल ऐकले आहे. अशी एक नाही तर अमर्यादित प्रकरणे आहेत. चित्र अद्याप समोर आलेले नाही.

सोमवारी, मतदार पडताळणी आणि निवडणुकीत मत चोरीच्या आरोपांवरून ३०० विरोधी खासदारांनी संसदेपासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला.

यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी, अखिलेश यादव यांच्यासह अनेक विरोधी खासदारांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतल्यानंतर राहुल गांधी म्हणाले - ही संविधान वाचवण्याची लढाई आहे. ही एक व्यक्ती-एक मताची लढाई आहे, म्हणून आम्हाला स्वच्छ मतदार यादी हवी आहे. प्रियंका गांधी म्हणाल्या की हे सरकार घाबरलेले आणि भित्रे आहे.

मोर्चादरम्यान अखिलेश यांनी बॅरिकेड्सवरून उडी मारून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. खासदारांना पुढे जाऊ दिले नाही तेव्हा ते जमिनीवर बसले. प्रियंका आणि डिंपलसह अनेक खासदार 'वोट चोर गड्डी सोड' असे नारे लावताना दिसले.

निषेधादरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या खासदार मिताली बाग आणि महुआ मोईत्रा यांची प्रकृती बिघडली. त्या बेशुद्ध पडल्या. राहुल गांधी आणि इतर खासदारांनी त्यांना मदत केली. यापूर्वी दोन्ही सभागृहात या मुद्द्यावर मोठा गोंधळ झाला.

## राज्यात ५० आरएफओंच्या विनंती बदल्यांचे आदेश जारी

### पदस्थापनेत अंशतः बदल ; मंत्रालयातून आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**



राज्याच्या महसूल व वन विभागाने बहुप्रतीक्षेनंतर ५० वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या (आरएफओ) विनंती बदल्यांचे आदेश सोमवारी जारी केले आहेत. यात आरएफओंच्या पदस्थापनेत अंशतः बदल करण्यात आले आहे. मात्र, यापूर्वी झालेल्या प्रशासकीय बदल्यांमध्ये अनेकांना 'स्पीड ब्रेकर' लागले होते. परंतु, या सर्व अडचणींवर मात करीत आता आरएफओंनी विनंती बदल्यांमध्ये बाजी मारल्याचे चित्र आहे.

अभिजीत ठाकरे (अकोट, वन्यजीव), ललिता सूर्यवंशी (हातकणंगले), सुनील वाकोडे (बुलढाणा प्रादेशिक), कोमल पिंडकुरवार (चाळीसगाव प्रादेशिक), जी. बी. लांबाडे (आर्वी सामाजिक), महेंद्र दबडे (रोहा प्रादेशिक), अरूप कन्नमवार (नागभिड), सुनील मेहरे (संभाजी नगर), मोहन शेळके (अहिल्यानगर), चेतन पाटील (तासगाव), नरेश भोवरे (वरोरा), अंगद खटाणे (भोकर प्रादेशिक), अनिल रासणे (नांदेड प्रादेशिक), मंगेश पाटील (हिमायतनगर), गणेश शेवाळे (बीड), विशाल गोडदे (ठाणे), प्रदीप चव्हाण (तुळशी, बोरीवली), रामचंद्र शेंडे (मूल, चंद्रपूर), प्रदीप मोडवान (कांदळवन, पालघर), साबु बिराजदार (जत, सांगली), श्रीकांत काळे (रावेर), तुकाराम जाधवर (बारामती), सागर मगर (सांगोला, सोलापूर), राहुल कारेकर (नागपूर), अमोल काशीकर (नवापूर), अर्जुन गंबरे (सातारा), कैलास सोनवणे (शिरपूर), संजय रघतवान (कोरेगाव), प्राची बिसेन (पुणे), चेतन राठोड (दिग्रस), श्रीनिवास कटकु (पेडीगुंडम, आलापल्ली), नितीन वाघ (नंदूरबार), स्वप्नील पवार (खामगाव), प्रिया काळे (छत्रपती संभाजी नगर), प्राशा पगार (चिचपाडा, नंदूरबार), संतोष शिरशेटवार (मांडवी, नांदेड), दिनेश देसले (मुरवाड, ठाणे), मनोजकुमार कोळी (ईस्लामपूर, सांगली), सचिन सावंत (आजरा, कोल्हापूर), विजय गंगावणे (खापा, नागपूर), विनोद दळवी (मोखडा, जव्हार), गायत्री सोनवणे (मालेगाव, नाशिक), नरेंद्र मुठे (ठाणे), विवेक येवतकर (अमरावती), प्रियांका भिसे (वैजापूर, संभाजी नगर), शेषराव टुले (देवलापार, नागपूर), सागर आरडेकर (उधवा, डहाणू), शेख लियाकत अली (धारणी, मेळघाट), वर्षा हरणे (अमरावती), प्रदीप भड (वडाळी, अमरावती) अशा विविध ठिकाणी विनंती बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

## देशात पहिल्यांदाच ड्रोनद्वारे राजस्थान मध्ये पाडण्यात येणार कृत्रिम पाऊस, अमेरिकन कंपनीची घेण्यात येणार मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२जयपूर**




राजस्थानमधील १२९ वर्षे जुने असलेले ऐतिहासिक रामगड धरण पुनरुज्जीवित करण्याकरिता ड्रोनचा वापर करण्यात येणा आहे. हवामानाची स्थिती अनुकूल राहिली तर आज देशात पहिला कृत्रिम पाऊस ड्रोननं पाडण्यात येणार आहे.

दोन दशकांपासून कोरडे असलेल्या रामगड धरणात नवीन वैज्ञानिक तंत्रानं जलसाठा भरण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशात पहिल्यांदाच आज ड्रोन आणि एआय तंत्रज्ञानाद्वारे कृत्रिम पाऊस पाडला जाणार आहे. या कार्यक्रमाचा उद्देश भूपृष्ठावरील पाण्याच्या स्रोताचं पुनरुज्जीवन करणं आहे. त्यामुळे जयपूरला पिण्याच्या पाण्याकरिता दिलासा मिळणार आहे. त्याचबरोबर धरणाशी संबंधित पर्यावरण आणि जैवविविधतेचेही जतन होण्यास मदत होणार आहे.

३१ जुलै रोजी कृत्रिम पाऊस पाडण्याचं नियोजन करण्यात आल होतं. परंतु हवामान विभागानं प्रतिकूल स्थिती असल्याचं लक्षात आणून दिल्यानंतर कृत्रिम पाऊस पाडण्याचा कार्यक्रम पुढे ढकलावा लागला. गेल्या आठवड्यात बुधवारी राजस्थानचे कृषीमंत्री किरोरी लाल मीना यांनी अमेरिकन कंपनीच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेत ड्रोनद्वारे पाऊस पाडण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १२ ऑगस्ट ही नवीन तारीख निश्चित करण्यात आली. एका अमेरिकन कंपनीकडून रामगड धरणावर कृत्रिम पाऊस पाडण्यात येणार आहे. त्यासाठी ड्रोन आणि एआय आधारित क्लाउड सीडिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. पावसासाठी लागणारे ड्रोन तैवानमधून मागवण्यात आले आहेत. त्यांची चाचणी धरण परिसरातही घेण्यात आली आहे. या प्रक्रियेत ड्रोन हजारो फूट उंचीवर जाऊन ढगांमध्ये मीठाचा फवारा करण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्याचे लहान कणात घनरूप होऊन पावसाचे थेंब तयार होतील. त्याचाच परिणाम होऊन पाऊस पडेल.


ड्रोनद्वारे रसायने फवारून ढगांना छिद्र पाडण्याची प्रक्रिया म्हणजे कृत्रिम पाऊस असते. या प्रक्रियेसाठी, जयपूरमधील जल महाल येथे असलेले मानसागर धरणाची प्रथम प्रायोगिकरित्या निवड करण्यात आली. परंतु हा परिसर दाट लोकवस्तीच्या जवळ असल्यानं आणि क्षेत्रफळ लहान असल्यानं नैसर्गिक आपत्ती येण्याची भीती आहे. त्यामुळे तज्ञांनी कृत्रिम पावसासाठी रामगड धरणाचा निर्णय घेतला. हा परिसर क्षेत्रफळाच्या दृष्टीनं खूप मोठा आहे. कमी लोकसंख्या असलेल्या या भागात धरणदेखील कोरडे आहे.

राजस्थानमध्ये कृत्रिम पावसाबाबत यापूर्वीही प्रयोग करण्यात आले आहेत. चित्तौडगडमधील घोसुंडा धरणावर कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला होता. आज कृत्रिम पावसासाठी कृषी आणि आपत्ती निवारण मंत्री डॉ. किरोडी लाल मीना आणि स्थानिक आमदार महेंद्र पाल मीना यांनी मोठ्या संख्येनं ग्रामस्थांना आमंत्रित करण्यात आलं आहे. तेदेखील ऐतिहासिक अशा धरणातील कृत्रिम पावसाचे साक्षीदार होणार आहेत.

## निवडणुका आल्या की मनोज जरांगे वातावरण खराब करतात - परिणय फुके

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

निवडणुका आल्या की मनोज जरांगे पाटील बाहेर पडतात. काहीतरी बेताल विधाने करून, आरोप-प्रत्यारोप करून स्वत:ला मीडियामध्ये चर्चेत ठेवण्याचा प्रयत्न करत असतात. मनोज जरांगे यांना मराठा समाजाला नक्की आरक्षण मिळवून द्यायचे आहे की नाही, हा सगळ्यात पहिला प्रश्न आहे. मराठ्यांना न्याय द्यायचा आहे की नाही. मराठा आणि ओबीसीसह इतर समाजात भांडणे लावण्याचे काम मनोज जरांगे पाटील करत आहेत. या माध्यमातून महाराष्ट्रात अराजकता पसरवायचे काम मनोज जरांगे पाटील करत आहेत, अशी घणाघाती टीका भाजपा नेते परिणय फुके यांनी केली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर मनोज जरांगे पाटील यांनी केलेले आरोप अतिशय खालच्या दर्जाचे आणि किळसवाणे आहेत. कोणत्याही प्रकरचा कट कुणी करत नाही. मराठा आरक्षणासाठी सर्वांत जास्त प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय त्यांच्याच कार्यकाळात झाला. तो निर्णय हायकोर्टात टिकला. पण सुप्रीम कोर्टात टिकू शकला नाही. मराठा समाजासाठी सारथी सारखी योजना आणून मराठा युवकांना कौशल्य विकास, शिष्यवृत्ती, रोजगार निर्मिती, स्वयंरोजगार निर्मिती, उद्योजक बनवणे यासाठी हजार कोटी रुपये दरवर्षी सारथीला दिले जातात. गरीब समाजातील मराठा युवकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले, असे परिणय फुके यांनी नमूद केले.

## राज ठाकरे सध्यातरी आमच्या आघाडीत नाहीत - रमेश चैनिथला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२पुणे**

काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतांच्या चोरीचा आरोप करत निवडणूक आयोग आणि केंद्रातील मोदी सरकारला लक्ष्य केलं आहे. त्यावरुन, इंडिया आघाडी व महाविकास आघाडीने जोरदार निदर्शने करत आक्रमक भूमिका घेतली आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून विविध राजकीय पक्षांनी तयारी देखील सुरू केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र प्रभारी रमेश चैनिथला यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदेश काँग्रेस पदाधिकारी कार्यशाळेचा समारोप होत आहे. या कार्यशाळेत बोलताना चैनिथला यांनी राज्यातील निवडणुकांबाबत बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे.

आगामी निवडणुकीत आघाडी होऊ शकते किंवा होऊ ही शकणार नाही, असे रमेश चैनिथला यांनी म्हटल्याने महाविकास आघाडीच्या भवितव्यावर मोठं वक्तव्य केल्याचं दिसून येत आहे. आघाडीबाबत आम्ही बसून चर्चा करून निर्णय घेऊ, दोन भाऊ एकत्र येत असतील तर आम्हाला काय अडचण नाही. मात्र, राज ठाकरे सध्या तरी आमच्या आघाडीत नाहीत, असे रमेश चैनिथला यांनी म्हटलं

## रक्षाबंधन निमित्त प्रवासी बंधू कडून एसटीला १३७ कोटी रुपयांची ओवाळणी : ना. प्रताप सरनाईक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

यंदा रक्षाबंधन आणि त्याला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे ८ ते ११ ऑगस्ट या चार दिवसांमध्ये प्रवाशांनी तुडुंब भरलेले एसटीमधून महामंडळाला १३७.३७ कोटी रुपयांची उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे ११ ऑगस्टला एका दिवशी तब्बल ३९ कोटी रुपयांचे उत्पन्न महामंडळाला प्रवासी वाहतुकीतून मिळाले आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील हे विक्रमी उत्पन्न आहे.



अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, दरवर्षी एसटीला रक्षाबंधन आणि भाऊबीज (दिवाळी) या दोन दिवसात विक्रमी उत्पन्न मिळत असते. कारण, या दिवशी भाऊ बहिणीकडे किंवा बहिण भावाकडे असे प्रवासी दळणवळण मोठ्या प्रमाणामध्ये होते. परिणामी गेली कित्येक वर्ष रक्षाबंधनच्या सणाच्या कालावधी एसटीला त्या वर्षातील विक्रमी उत्पन्न मिळत आले आहे. यंदा रक्षाबंधन आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी एसटीला प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती. रक्षाबंधन च्या आदल्या दिवशी म्हणजे शुक्रवारी ३०.०६ कोटी रुपये रक्षाबंधन दिवशी म्हणजे शनिवारी ३४.८६ कोटी व दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी ३३.३६ कोटी रुपये तर सोमवारी तब्बल ३९..९ कोटी इतके विक्रमी उत्पन्न एसटीला मिळाले. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने ८-११ ऑगस्ट या ४ दिवसात १ कोटी ९३ लाख प्रवाशांनी एसटीमधून सुरक्षित प्रवास केला आहे. त्यामध्ये महिला प्रवाशांची संख्या तब्बल ८८ लाख आहे.

## अमरावती विभागात अकरावीच्या ७२ हजारांवर जागा रिकाम्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत अमरावती विभागात बऱ्याच जागा रिक्त राहिल्या असून यंदा आतापर्यंत एकूण १ लाख ९१ हजार ७५ जागांपैकी 'कोटा', 'कॅप' आणि 'ओपन टू ऑल' फेरीतून १ लाख १८ हजार ७२५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. अजूनही तब्बल ७२ हजार ३५० जागा रिक्तच आहेत. इयत्ता अकरावीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अद्यापपर्यंत व्हावयाचे आहेत, त्यांच्यासाठी १५ ऑगस्ट ते १७ ऑगस्टपर्यंत विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष फेरीची गुणवत्ता यादी १९ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे. २० ऑगस्ट पर्यंत विद्यार्थ्यांनी संबंधित उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करावयाचा आहे, अशी माहिती ११ वी प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली आहे. सर्व शाखांमध्ये पुरेशा जागा शिल्लक आहेत, असेही त्यांनी सांगितले आहे.




अमरावती विभागातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या कनिष्ठ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ही १ लाख ९१ हजार ०७५ इतकी आहे. त्यात अमरावती जिल्ह्यातील ४२ हजार १८० जागांपैकी २१ हजार ३५२ जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. अकोला जिल्ह्यातील ३७ हजार ४७५ जागांपैकी २६ हजार ९२२, बुलढाणा जिल्ह्यातील ४७ हजार जागांपैकी ३० हजार ३६५, वाशीम जिल्ह्यातील २४ हजार जागांपैकी १५ हजार ११ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ४० हजार १३० जागांपैकी २५ हजार ७५ जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.आतापर्यंत कला शाखेत ४५ हजार १७९, वाणिज्य शाखेत ९ हजार ६३४ आणि विज्ञान शाखेत सर्वाधिक ६३ हजार ९१२ असे एकूण १ लाख १८ हजार ७२५ जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. यंदा प्रथमच राज्यभरात केंद्रीय प्रवेश प्रक्रियेनुसार अकरावी प्रवेशासाठी फेरीचे आयोजन करण्यात आले होते. तांत्रिक अडचणींमुळे अनेकदा ही प्रक्रिया रखडली. यंदा शालेय शिक्षण विभागाने दहावीच्या परीक्षा वेळेआधीच घेत निकालही १३ मे रोजी जाहीर केले होते. त्यानंतर १९ मेपासून विद्यार्थ्यांसाठी अकरावी ऑनलाइन प्रक्रिया सुरू करण्याची घोषणाही झाली होती.

१९ आणि २० मे रोजी सराव सत्रे पार पडल्यावर २१ मेपासून प्रत्यक्ष विद्यार्थी नोंदणी सुरू होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात २६ मेपासून ही प्रक्रिया सुरू झाली. सात-आठ वेळा प्रवेशाचे वेळापत्रक बदलण्यात आले. प्रवेशासाठी चार फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, विद्यार्थ्यांनी यंदा अभियांत्रिकी आणि पॉलिटेक्निक अभ्यासक्रमाकडे कल दर्शविला.

## शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांनी मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करावे - प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

शिक्षण घेत असतांना आपल्यासमोर भविष्य असते, स्वप्न असते व ते पूर्ण करण्यासाठीच आपण शिक्षण घेत असतो, मात्र शिक्षण घेत असतांना विद्याथ्र्यांनी आपल्या सभोवताल मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण केले पाहिजे, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विद्याथ्र्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मंगळवार दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी राष्ट्रीय अँटी रॅगिंग डे व सप्ताहाचा शुभारंभ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते झाला, त्याप्रसंगी अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना ते बोलत होते. मंचकावर अँटी रॅगिंग स्कॉडचे अध्यक्ष डॉ. प्रणव कोलते, नोडल ऑफिसर डॉ. प्रशांत ठाकरे, स्कॉडच्या सदस्य डॉ. कल्पना जावळे उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. ढोरे म्हणाले, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा मी सुध्दा विद्यार्थी होतो. त्याही वेळी विद्यापीठ कॅम्पसमध्ये कधीही रॅगिंगचा प्रकार घडला नाही आणि आताही नाही. त्यामुळे विद्याथ्र्यांनी पुढेही असेच वातावरण निर्माण करावे. आयुष्याची शिदोरी म्हणजे शिक्षण असते. आपले व्यक्तिमत्व विद्याथ्र्यांनी घडवावे. सप्ताहभर होणा-या कार्यशाळेमध्ये सहभागी होवून त्यातून माहिती घ्यावी व त्याचे अनुकरण करावे. तसेच सिनियर विद्याथ्र्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्टुडंट इंडेक्स प्रोग्रामनुसार आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

अँटी रॅगिंग स्कॉडचे नोडल ऑफिसर डॉ. प्रशांत ठाकरे यांनी अँटी रॅगिंग सप्ताह आयोजनामागील भूमिका मांडतांना महाराष्ट्रात काही ठिकाणी झालेल्या रॅगिंगचे प्रकार व त्यानंतर झालेल्या कारवाईबाबत विद्याथ्र्यांना अवगत केले. प्रास्ताविकातून डॉ. प्रणव कोलते यांनी अँटी रॅगिंग डे व सप्ताहाच्या आयोजनाचे महत्व विषद केले.

## संपादकीय ......

# पवारांचा आत्मघातकी राजकीय बारूद!

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख आणि राज्यातील महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत एक बॉम्ब टाकला. तो सत्ताधार्यांपेक्षा शरद पवारांसह त्यांनी ज्यांची नावे घेतली आहेत, त्यांना हानिकारक ठरण्याची दाट शक्यता आहे. शरद पवार म्हणाले की, २०२४ च्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन माणसे मला भेटली, त्यांनी सांगितले की, या निवडणुकीत आम्ही तुम्हाला १६० जागा खात्रीशीर निवडून देतो. त्यानंतर मी त्या दोघांना राहुल गांधी यांच्याकडे घेऊन गेलो. त्यांना भेटवले, पण आम्ही त्या दोन माणसांचा प्रस्ताव फेटाळून लावला. त्यात पुन्हा आता उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केवळ शरद पवार नव्हे तर उद्धव ठाकरे यांनाही निवडणूक जिंकून देण्याचा दावा करणारी माणसे लोकसभा निवडणुकीपूर्वी आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी भेटली होती, पण आम्ही त्यांना घालवून दिले.

शरद पवार यांनी दोन माणसांना राहुल गांधी यांना भेटवले असे म्हटले आहे, पण अजून याविषयी राहुल गांधी यांची प्रतिक्रिया आलेली नाही. राहुल गांधी यांनी दिल्लीत नुकतीच इंडिया आघाडीची बैठक घेतली आणि त्यात निवडणुकांमध्ये कसा घोटाळा झाला आहे, मतांची चोरी कशी झाली आहे, याविषयीचे सादरीकरण करून निवडणूक आयोगाला लक्ष्य केले. त्यावर निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना ते करत असलेल्या आरोपांबाबत प्रतिज्ञापत्र सादर करायला सांगितले आहे. राहुल गांधी यांनी जे मतचोरीचे आणि कमी वेळात जास्त मतदान झाल्याचे किंवा एकाच नावाच्या अनेक व्यक्ती दाखवल्याचे म्हटले आहे, त्यामुळे जनतेत निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

राहुल गांधींनी निवडणूक आयोग आणि भाजपविरोधात माहोल उभा केलेला असताना शरद पवार यांनी जो गौप्यस्फोट केला त्यामुळे राहुल गांधी यांच्या परिश्रमाला सुरुंग लागण्याची शक्यता आहे. कारण पवारांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शरद पवार आणि राहुल गांधी हे जबाबदार नागरिक आहेत. त्यांनी अशा प्रकारे गैरप्रकारांना प्रवृत्त करणार्या माणसांची पोलीस आणि निवडणूक आयोगाकडे त्यावेळी तक्रार का केली नाही, तुम्हाला हे सगळे आता इतक्या उशिरा का आठवत आहे, याचे उत्तर द्या. त्यात पुन्हा संशय वाढणारी गोष्ट म्हणजे पवार म्हणाले की, ती दोन माणसे आपल्याला भेटली त्यांची नावे आणि पत्ते आम्हाला माहीत नाहीत.

पवारांचा हा दावा तसा पटणे अवघड. कारण विधानसभेत बहुमत मिळवून देतो, असा दावा करणार्या माणसांची नावनिशी खातरजमा केल्याशिवाय ते पवारांपर्यंत कसे काय पोहोचू शकतात? पवार अज्ञात माणसांना घेऊन त्यांची राहुल गांधींशी इतक्या गंभीर विषयाबाबत कशी भेट घडवून आणू शकतात? ती दोन माणसे कोण आणि त्यांना शोधणार कसे, असा प्रश्न उपस्थित झालेला असताना वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर म्हणाले की, जेव्हा पवार त्या दोन माणसांना राहुल गांधी यांना भेटायला घेऊन गेले तेव्हा त्या दोघांची नावे प्रवेश वहीत नोंद असणार, तिथून त्यांची नावे सापडू शकतात. आता ती दोन माणसे कोण होती, त्यांचा शोध घेणे आवश्यक आहे. कारण ती दोन माणसे सापडली तर अनेक गोष्टींचा उलगडा होऊ शकतो.पवारांनी केलेला दावा ही काही साधी गोष्ट नाही, त्यांनी एक प्रकारे बॉम्ब टाकला आहे. पण दुसर्या बाजूला त्यांनी निवडणूक आयोग, केंद्र सरकार आणि भाजपचे नेते यांच्या हातात आयते कोलीत दिले आहे. कारण निवडणुकीत गैरप्रकार करणार्या जर अशा व्यक्ती होत्या तर ते तुम्ही आम्हाला कळवायला हवे होते, असा गैरप्रकार करणार्या माणसांची तुम्हाला माहिती असताना ती तुम्ही आम्हाला कळविली नाही हा तुमचाच दोष आहे, असे निवडणूक आयोग उद्या पवार, ठाकरे आणि राहुल गांधी यांना म्हणू शकतो. इतकेच नव्हे तर भाजपचे नेतेसुद्धा पवार, ठाकरे आणि राहुल गांधी यांना पेचात पकडून जाब विचारू शकतात. पवारांच्या या विधानामुळे एक प्रकारे केंद्र सरकार आणि निवडणूक आयोग यांची बाजू सुरक्षित झाली आहे. त्यामुळे राहुल गांधी यांनी जे काही निवडणूक आयोगाच्या विरोधात प्रेझेंटेशन देऊन रान उठवले आणि पुरावे दिल्याचा दावा केला, ते सगळे वाया गेले आहे, असेच म्हणावे लागेल. कारण एका बाजूला निवडणुकीत मतांची चोरी करून घोटाळा झाल्याचा आरोप राहुल गांधी करत आहेत, तर त्याच वेळी इंडिया आघाडीतील प्रमुख नेते शरद पवार यांनी निवडणुकीत घोटाळा करणार्यांची माहिती दडवून ठेवली.त्याला काय म्हणावे? म्हणजे निवडणूक आयोगाला तुम्ही खोटे पाडता आणि दुसर्या बाजूला निवडणुकीत घोटाळा करणार्या माणसांची माहिती लपवून ठेवता, असा प्रश्न उद्या इंडिया आघाडीला विचारला जाऊ शकतो. त्यामुळे इंडिया आघाडीने निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर काढलेल्या मोर्चाला काय अर्थ उरतो. राहुल गांधी यांनी निवडणूक घोटाळ्याविरोधात रान उठविलेले असताना पवार आणि राऊत यांनी अशी विधाने करून त्यातील हवाच काढून टाकली आहे. त्यामुळे इंडिया आघाडीत संशयाचे वातावरण निर्माण होईल. १९९३ साली मुंबईत १२ बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आले होते. त्यावेळी मुस्लीम लोकांना लक्ष्य केले जाऊ नये म्हणून १३ वा बॉम्बस्फोट मुस्लीमबहुल महमदअली रोडवर झाला, असे सांगून त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेल्या शरद पवार यांनी एक काल्पनिक बॉम्बस्फोट घडवला होता, पण आता त्यांनी जो बॉम्ब टाकला आहे, त्यामुळे इंडिया आघाडीच हादरली आहे. त्यांचा हा बॉम्ब आत्मघातकी ठरू शकतो.






## बैठ्या कामामुळे बदलतोय हाडांचा आकार

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

जर तुम्हीही दिवसातील सर्वाधिक वेळ बसून काम करण्यात घालवत असाल तर हा लेख तुमच्यासाठीच आहे. कारण सध्याच्या बदलत्या वर्क कल्चरमध्ये फिल्डवर काम करणाऱ्यांच्या तुलनेत ऑफिसमध्ये बसून किंवा वर्क फ्रॉम होम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये हाडांची दुखणी वाढत असल्याचे समोर आले आहे. यात प्रामुख्याने दिवसभर आठ– नऊ तास बैठे काम करणाऱ्यांना पाठदुखीबरोबरच मानदुखीचे विकार होत आहेत. हे कर्मचारी दिवसातील जास्तीत जास्त वेळ एकाच जागी एकाच पोझीशनमध्ये काम करत असल्याने हळूहळू त्यांच्या हाडांचा आकारच बदलू लागल्याचे तज्त्रांनी सांगितले आहे. या अवस्थेला ऑफिस चेयर सिंड्रोम असे नाव देण्यात आले असून वयस्क व्यक्तींपेक्षा तरुणांमध्ये हाडांचा हा नवा विकार वेगाने वाढत आहे.

बैठ्या कामात व्यक्ती कम्प्युटर समोर साधारण ७ ते ८ तास एकाच जागी बसून काम करते. अशावेळी शरीराचा भार मणके व कंबर, नितंब, पायांवर पडतो.त्यामुळे शरीराच्या नैसर्गिक रचनेवर त्याचा परिणाम होतो. परिणामी हळूहळू सांधे व स्नायू, नसा कमकुवत होतात आणि त्याचा आकार बदतो. त्यामुळे हाड ठिसूळ होतात. यामुळे बैठे काम करणाऱ्यांना हाडे व स्नायूंच्या समस्या त्रास देतात. शरीरात ब्लड सकर्युलेशन नीट होत नाही. यामुळे स्लिप डिस्क, सर्वायकल स्पॉन्डेलायसिस, वेरिकोज वेन्स, नसा सुजणे- फुगणे यासारख्या समस्या उद्भवतात. यावर वेळीच उपाय न केल्यास भविष्यात ऑस्टियोपोरोसिस होऊ शकतो. शरीराची हाचचाल नसल्याने पचनासंबंधी समस्या निर्माण होतात. टाईप २ डायबिटीज. ब्लड प्रेशरसारख्या व्याधी मागे लागतात.

**बचावासाठी काय करावे ?**

यासाठी जर सुरुवातीपासून योग्य खबरदारी घेतली तर ऑफिस चेयर सिंड्रोमचा धोका टाळणे शक्य आहे.

त्यासाठी दर १५ मिनिटांनी बसल्या जागेवरून उठावे

२.३ मिनिट चालावे, स्ट्रेचिंग करावे.

पाणी बाजूला घेऊन न बसता जागेवरून उठावे.

त्यामुळे शरीराची हालचाल होते.

काम करतेवेळी कम्प्युटर किंवा लॅप टॉप तुमच्या डोळे व शरीरापासून ठराविक उंचीवर ठेवावा.साधारण खुर्ची न वापरता एर्गोनॉमिक खुर्चीचा वापर करावा

बसल्यावर पाय जमिनिला टेकतील असे बसावे. दररोज ३० मिनिट चालावे.

# सर्वधर्मीय बांधवांसोबतच वृक्षाला राखी बांधून दिला अनोखा संदेश

## गुरुकुंजात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवती विचार मंचचे रक्षाबंधन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२गुरुकुंज मोझरी**



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवती विचार मंच, महाराष्ट्र राज्याच्या वतीने श्रीगुरुदेव अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी येथे सर्वधर्मीय सामुदायिक रक्षाबंधन सोहळा उत्साहात पार पडला. या वेळी पहिली राखी निसर्गासाठी हा उपक्रम राबवत पहिली राखी झाडाला बांधत वृक्षारोपण करण्यात आले.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शफिक शहा होते. श्री गुरुदेव अध्यात्मिक गुरुकुलचे संचालक रवी मानव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष अमर वानखडे, शीख धर्मीय संगीतसिंग बावरी, जैन धर्मीय सचिन नागमोते, बुद्ध धर्मीय दिवाकर भुरभुरे, मुस्लिम धर्मीय फिरोज भाई, ख्रिश्चन धर्मिय रवींद्र कांबळे, योगिता वरठे, छाया मानव आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

सामुदायिक रक्षाबंधन सोहळ्याचा उद्देश हा समाजात बंधुभाव, ऐक्य व परस्पर सन्मानाची भावना दृढ करणे होता. या वेळी हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध इत्यादी सर्व धर्मांच्या बहिणींनी विविध धर्मातील बंधूंना राखी बांधून सद्भावना व भाईचाऱ्याचा संदेश दिला. रक्षाबंधनाच्या माध्यमातून बंध हा केवळ रक्ताचा नसून मनांचा असतो, हा अनोखा संदेश या कार्यक्रमातून समाजात पोहोचवण्यात आला. कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार, त्यांच्या ग्रामगीतेतील सामुदायिक सलोख्याचे संदेश तसेच महिला सक्षमीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, कृषी विभाग, शैक्षणिक विभाग, साहित्यिक विभाग, आरोग्य विभागाच्या दृष्टीने राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. तसेच पहिली राखी निसर्गासाठी हा उपक्रम राबवत पहिली राखी झाडाला बांधून वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवती विचार मंचाने समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन सामंजस्य, मैत्री आणि सामाजिक सलोखा वाढवण्यासाठी अशा उपक्रमांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवती विचार मंचच्या जान्हवी राऊत यांनी केले. सूत्रसंचालन राज्य कार्यकारिणी सदस्य नंदिनी कडू यांनी केले, तर आभार उपाध्यक्ष मोनिका बोराळकर यांनी मानले. कार्यक्रमाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवती विचार मंच महाराष्ट्र राज्य अध्यक्ष साक्षी पवार, संपर्कप्रमुख साक्षी सगणे, नूतन पवार, प्रमोद बोराळकर, प्रशांत सुरोसे, रोशन ठाकरे, पवन खरासे, अनुप देशमुख यांच्यासह राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

१५ ऑगस्टपर्यंत वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन सप्ताह ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन सप्ताह राबवण्यात येत आहे. त्यानिमित्त राज्यात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येत असल्याची माहिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवती विचार मंचच्या संपर्कप्रमुख साक्षी सगणे यांनी दिली.

# डाळिंबावरील फळ पोखरणारी अळी रस शोषणारे भुंगेरे यांचा असा करा बंदोबस्त




**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

डाळिंब पिकावरअनेक किडींचा प्रादुर्भाव होतो, अशा किडींचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे असते. जेणेकरून अधिक नुकसान होणार नाही. यामध्ये प्रामुख्याने डाळिंब फळ पोखरणारी अळी, रस शोषणारे भुंगेरे या किडींचा समावेश होतो. या किडींचे नियंत्रण कसे करावे? हे पाहुयात....

**फळ पोखरणारी अळी**

अळी किंवा अंडी यांचा कमी प्रादुर्भाव असल्यास एकच फवारणी घ्यावी.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

जास्त प्रादुर्भावाच्या स्थितीत पुढील प्रमाणे ७ते १० दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या घ्याव्यात.

अंडी आढळून आल्यास, झाडिरॅक्टिन किंवा कडुनिंब तेल (१० हजार पीपीएम) ३ मि.ली. किंवा करंज तेल ३ मि.ली. किंवा वरील दोन्ही तेलांचे मिश्रण प्रत्येकी ३ मि.ली. प्रति लिटर पाणी

खराब झालेली / छिद्र असलेली फळे दिसत असल्यास, सर्व खराब झालेली आणि छिद्र असलेली फळ काढून खड्डयात पुरून टाकावीत. सायण्ट्रानिलीप्रोल (१०.२६ ओडी) १.८ मि.ली. किंवा क्लोर एट्रानिलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मि.लि. अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मि.लि. प्रति लिटर पाणी.

**रस शोषणारे भुंगेरे**

थायमिथॉक्झाम (१२.६%) + लॅमडा सायहॅलोथ्रिन (९.५% झेडसी) ०.५० मि.लि. किंवा स्पिनेटोरम (२.५ एससी) १ मि.लि. किंवा क्लोरण्ट्रानिलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मि.लि. अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मि.लि. प्रति लिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी.

**– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**

# सुशिक्षित तरुणांसाठी टाटा मोटर्सची सुवर्णसंधी!

## बेनोडा शहीद येथे उत्साहात मुलाखती; उत्स्फूर्त गर्दीने कार्यक्रमाला रंगत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२वरूड**



स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी रोजगाराचा सुवर्णद्वार उघडत टाटा मोटर्स कंपनीच्या भरती मुलाखती विश्रामगृह, बेनोडा शहीद येथे घेण्यात आल्या. इच्छुक उमेदवारांच्या उत्स्फूर्त गर्दीमुळे संपूर्ण परिसर रोजगारमय वातावरणाने गजबजून गेला.या मुलाखतींमध्ये टाटा मोटर्स कंपनीचे एच. आर. अनिल सावरकर यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांची निवड प्रक्रिया पार पाडली. यावेळी पत्रकार विलास पाटील यांनी आयोजनाची धुरा सांभाळत कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.कार्यक्रमाला बेनोडा शहीदच्या सरपंच रजनी कुबडे, अशोक कुबडे तसेच काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष मनोज गेडाम यांनी सदिच्छा भेट देऊन रोजगार उपक्रमाचे कौतुक केले. तसेच यशवंत खडसे, विजय बांबल, चेतन पोटोडे, बाल्या गोहाड यांचीही प्रामुख्याने उपस्थिती लाभली.मुलाखतीदरम्यान उमेदवारांच्या चेहऱ्यावर नोकरीची संधी मिळण्याचा उत्साह आणि आत्मविश्वास स्पष्टपणे जाणवत होता. हा उपक्रम ग्रामीण भागातील तरुणांच्या रोजगार संधींना चालना देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# विद्यापीठातील गृहविज्ञान विभागाच्यावतीने 'मानवी मनाचे चित्रपटमय अन्वेषण' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे १३ ऑगस्ट रोजी आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभागाच्यावतीने दि. १३ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता 'मानवी मनाचे चित्रपटमय अन्वेषण' (सिनेमॅटिक एक्सप्लोरेशन ऑफ द ह्युमन सायके) या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे गृहविज्ञान विभागातील सेमिनार हॉलमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित राहतील. प्रसिद्ध दिग्दर्शक, निर्माते आणि मानसशास्त्रीय सल्लागार डॉ. मिलिंद आपटे हे सदर कार्यशाळेत रिसोर्स पर्सन म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करतील.तरी आयोजित कार्यशाळेला सर्वांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय व कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख यांनी केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण

# ३६५ दिवसांच्या 'त्या' हॉटेलात मंत्री; दिशाभूल की राजाश्रय?

## दोन माजी मंत्र्यांचा सवाल; निकटवर्तीयांनी ठेवले वस्तुस्थितीपासून अनभिज्ञ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्हा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे रविवारी दुपारी आपल्या स्थानिक राजकीय सहकाऱ्यांसह येथील जुना बायपासस्थित एका हॉटेल रेस्टॉरंटमध्ये पोलिस बंदोबस्तात नाश्ता करण्यास पोहोचले होते, त्यावर पालकमंत्री इतक्या बदनाम हॉटेलात जाऊच कसे शकतात, असा रोकडा सवाल माजी मंत्री बच्चू कडू व डॉ. सुनील देशमुख यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे मोठा गहजब उडाला. सोमवारी राजकीय वर्तुळासह खाकीतही तो नाश्ता चांगलाच चर्चिला गेला.त्याचे झाले असे की, गेटवरील पोलिस अधिकाऱ्यांचा कडक सॅल्युट घेऊन पालकमंत्री आत गेले. अर्धा तास ग्राउंड फ्लोअरवर नाश्ता करून तो सारा लवाजमा पुढे मार्गस्थ झाला. यापूर्वी कारवाई झालेल्या व आताही पोलिसांच्या रडारवर असलेल्या त्या हॉटेलात पालकमंत्र्यांना नेमके नेले कुणी, त्यांची दिशाभूल केली कुणी, अशी प्रश्नांची मालिका राजकीय वर्तुळात दिवसभर खमंग चर्चेचा मेन्यू ठरली. कुणी कुठे नाश्ता करावा, हा प्रत्येकाच्या आवडीनिवडीचा प्रश्न. बावनकुळे हे पालकमंत्री असले तरी येथील कुठले हॉटेल चांगले अन् कुठले बदनाम, हे त्यांना माहीत असण्याची फारशी शक्यता नाही. त्यामुळे ते स्वतःहून तेथे गेले नसावेत. त्यांच्या निकटवर्तीयांनी त्यांना ते का बरे सांगितले नसावे, की साहेब, आपण ज्या हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये जात आहोत, तेथे काही अवैध धंदे बिनदिक्कतपणे चालतात. तेथे पालकमंत्र्यांसारख्या संवैधानिक पदावरील व्यक्तींनी जाणे योग्य नाही. मात्र त्यांना असे कुणीही सांगितले नाही. विशेष म्हणजे त्या हॉटेलचालकाविरुद्ध यापूर्वी दोन गुन्हे दाखल आहेत. तेथे ३६५ दिवस नेमके काय चालते, तेदेखील सर्वश्रुत आहे.

### पालकमंत्री महोदय, सांगा पोलिसांनी काय धडा घ्यावा?



जे हॉटेल अख्ख्या शहरात अवैधधंद्यासाठी बदनाम आहे, तेथे जर आपण जात असाल, तेही पोलिस बंदोबस्तात, तर तुम्ही शहराच्या पोलिस यंत्रणेला नेमका कुठला संदेश देऊ इच्छिता, असा प्रश्न यानिमित्ताने माजी मंत्री बच्चू कडू यांनी पालकमंत्र्यांना उद्देशून उपस्थित केला आहे. एकीकडे शेतकऱ्यांकडे बियाण्यांसाठी पैसे नाहीत, तर दुसरीकडे आपण सर्किट हाऊस सोडून अशा बदनाम हॉटेलमध्ये जाता, यातून त्या हॉटेलचालकाची कॉलर टाईट झाली असेल, मात्र पोलिसांच्या मनोधैर्याचे काय, असा सवालदेखील बच्चू कडू यांनी उपस्थित केला आहे,

### समाजात चुकीचा मॅसेज, राजाश्रय की अनभिज्ञता?



त्या हॉटेलमध्ये '३६५' दिवस काय चालते, ते साऱ्या अमरावतीकरांना माहीत आहे. पालकमंत्र्यांच्या तेथील नाश्त्याने समाजात चुकीचा मेसेज गेला आहे. एकतर पालकमंत्र्यांचा त्या हॉटेलचालकाला राजाश्रय असावा अथवा त्यांच्या निकटवर्तीयांनी त्यांना त्यापासून अनभिज्ञ ठेवले असावे, अशी शक्यता आहे. पालकमंत्र्यांनी राणा भीमदेवी थाटात अवैध धंदे अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत, असा दम भरला होता आणि तेच अशा हॉटेलमध्ये जातात, याचे गुपित तरी काय, पोलिसांसमोर त्यांनी कुठला आदर्श ठेवला, असा प्रश्न माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

# श्रीकृष्ण मंदिर माताखिडकी (बुधवारा) येथे जन्माष्टमी उत्सवाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**



माताखिडकी (बुधवारा) येथील पुराण प्रसिध्द पुरातन श्रीकृष्ण मंदिरात दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येईल. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात सकाळी नामस्मरण, पारायण, देवास मंगलस्नान व उटी तसेच उपहाराचा कार्यक्रम होईल. त्यानंतर रात्री १२ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होईल अशी माहीती मंदिराचे ट्रस्ट कडून देण्यात आली आहे.

राजस्थानी शैलीतील धौलपूरी पिंक दगडामध्ये श्रीकृष्ण मंदिराची भव्य देखणी वास्तु बांधण्यात आली असून ती अमरावती शहराचे एक आर्कषण ठरली आहे. दिल्ली, पंजाब, राजस्थान, महाराष्ट्राचे काना कोपऱ्यातून तसेच देशभऱ्यातून भाविक भक्तगण मंदिरात दर्शनासाठी येतात. मंदिराचे परिसरातील चिंतामणी मंदिरात भक्तांनी केलेले नवस पूर्ण होऊन त्यांना ऐच्छीक फल प्राप्ती होत असल्याचे भाविक भक्त सांगतात. भागवतात आलेल्या कथे नुसार कौंडण्यपूर माहेर असलेल्या रुख्मिणीचा विवाह शिशुपालशी निश्चित झाला होता.

परंतु रुख्मिणीला त्यांचेशी विवाह करावयाचा नव्हता तीने मनोमन श्रीकृष्णाशी विवाह करण्याचे ठरविले होते. तिकडे श्रीकृष्णाने देखील रुखिम्णीचे निस्सीम प्रेमामुळे तिचेशीच विवाह करण्याचा मनात निश्चय केला होता.रुख्मिणीने आपला विचार एका पत्रात लिहून सुदेव नामक ब्राम्हणाच्या हस्ते श्रीकृष्णास प्रार्थना पूर्वक कळविला, शिशुपालाशी ठरलेल्या विवाहाचे एक दिवस पूर्वी कुळाचे रितीरीवाजानुसार नियोजित वधू म्हणून जेव्हा मी अंबादेवीचे दर्शनास जाईल तेव्हा आपण माझे हरण करावे असा प्रस्ताव रुख्मिणीने पत्रात श्रीकृष्णांना कळविला होता.

माताखिडकी (बुधवारा) येथील श्रीकृष्ण मंदिरात श्रीकृष्ण महाराजांचा तीन दिवस मुक्काम होता याच मंदिरात श्रीकृष्ण महाराज रुख्मिणीचे चिंतन करीत होते, ठरल्यानुसार रुख्मिणी अंबादेवीचे दर्शनास आली तेंव्हा तेथून तीचे श्रीकृष्णांनी हरण केले अशी आख्यायिका आहे.श्रीकृष्ण महाराजांचा त्यावेळी याच मंदिरात मुक्काम झाला असल्यामुळे हे मंदिर श्रीकृष्ण चरणांकित मंदिर आहे. नेहमीच भाविकांची येथे गर्दी असते. जन्माष्टमीला जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. जन्माष्टमीच्या दिवशी महोत्सवाचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी यांचा लाभघ्यावा असे आवाहन श्रीकृष्ण मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष पावडे, उपाध्यक्ष डॉ. अशोक राऊत, सचिव ड. अरुण ठाकरे, कोषाध्यक्ष एस. पी. देशमुख, विश्वत सुशांत चर्जन, रावसाहेब राऊत, अनिल सहानी व व्यवस्थापक मंडळ विनोद कराळे, नितीन देशमुख, राहुल सावरकर तर्फे करण्यात आले आहे.

# बेलोऱ्यातून पुणे, सुरत, बेंगलोरला लवकरच आकाशमार्ग सुरू

### आ. प्रतापदादा अडसड यांचा केंद्रात पाठपुरावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धामणगाव रेल्वे**



बेलोरा विमानतळ येथून मुंबईला विमानसेवा सुरू झाल्यानंतर आता बेंगलोर, सुरत, पुणे या मोठ्या शहरात आगामी काळात विमान उड्डाण घेणार असल्याचे आश्वासन केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिले.भारतीय जनता युवा मोर्चातील सहकारी केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची दिल्ली येथेआ. प्रताप अडसड यांनी भेट घेतली. धामणगाव मतदारसंघात येत असलेल्या बेलोरा विमानतळावरून पहिली मुंबई येथे विमान सेवा गत १६ एप्रिल रोजी सुरूझाली. आता पुणे, सुरत, बेंगलोर येथे जाण्यासाठी विमान सेवा सुरू होणे गरजेचे आहे तसेच आशिया खंडातील सर्वात मोठे उभारण्यात येणाऱ्या पायलट प्रशिक्षण केंद्र येथे स्थानिकांना रोजगारासाठी प्राधान्य द्यावे, अशी मागणी आ. प्रताप अडसड यांनी केली. दोन्ही मागण्या विषयी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सकारात्मक उत्तर देत याविषयी आगामी काळात निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी युवा मोर्चातील अनेक जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

# मेळघाटात एसटीची वाताहत; बोडजवळ बस बंद, दुसरी दिवसभर ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धारणी**

मेळघाटात एसटीने पुन्हा भंगार बसेस व कालबाह्य ठरलेल्या बसेसचे संचालन सुरू केल्याने मोठ्या अपघाताची चाहुल लागलेली आहे. सोमवारी भोकरबर्डी ते अमरावती जाणारी दर्यापुर डेपोची बस बोड गावाजवळ गरम होऊन बंद पडली. तर दोन दिवसापूर्वी नागपुर बस रिव्हर्स गेर फसल्याने बसस्थानकावर समोर सुदैवाने अपघात टळला.

सध्या मेळघाटातील धारणी व चिखलदरा, अमरावती–बुरहानपुर तथा इंदोर–नागपुर बसेस अत्यंत खराब म्हणजे भंगार गाडया पाठविण्यात येत आहे. प्रामुख्याने अमरावती, परतवाडा आणि दर्यापुर डेपोच्या गाडया रामभरोसे चालत आहेत. ११ ऑगष्ट रोजी भोकरबर्डी ते अमरावती जाणारी एमएच–४०–वाय–५९१५ क्रमांकाची बस बोड गावाजवळ अगदी प्लेन भागात गरम होऊन



बंद पडल्याने सकाळी प्रवाशी संकटात सापडलेले होते.

मिळालेल्या माहिती नुसार अंदाजे ४० प्रवाशी जंगलात थांबलेले होते.अखेर मागून येणाऱ्या एसटीने काही प्रवाशी परतवाडया पर्यंत गेले तर काहींनी इतर वाहनांना रोखून लिफ्अ मागितल्याची माहिती आहे. एका प्रवाशाने एसटीच्या जेष्ठ अधिकाऱ्याला फोनववर बसच्या फिटनेस बाबत माहिती दिली असता आम्ही काय करू शकतो, असे बेजवाबदार उत्तर देण्यात आले. दोन दिवसापूर्वी धारणी बसस्थानका समोरच रिव्हर्स घेताना गेर फसकल्याने ट्राफिक जाम झालेला होता. इंदोर–नागपुर बस क्रमांक एमएच–४०–सीएम–६०७८ (नागपुर, गणेशपेठ) एसटी रिव्र्व्हस होताना उभी होऊन अपघात सदृष्य स्थिती निर्माण झालेली होती. सुदैवाने अपघात झाला नाही.एस टी महामंडळानेटपांना प्लास्टीक कोटेड करून वेळ मारल्याचे काम केलेले आहे. मात्र, इंजन दुरूस्ती झालेली नाही अथवा जुन्या गाड्या न पाठविता नविन गाड्या सुरू करण्यात आल्या नसल्याने पुन्हा महा अपघातासाठी एसटी कडून वातावरण निर्मिती करण्यात येत आहे.

# शहरात ऑनलाईन शस्त्र मागवून त्याची विक्री करणाऱ्या आरोपीला बेलपुरा येथून अटक, ७ घातक शस्त्र जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

ऑनलाईन पद्धतीने ब्लु डार्ट कुरिअरमार्फत घातक शस्त्रे मागवून शहरात विक्री करणाऱ्या १९ वर्षीय युवकाला गुन्हे शाखा युनिट–२ने रंगेहात पकडले. ऋषी शंकर गोहर (रा. बेलपुरा) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून एकूण सात घातक शस्त्रे आणि मोबाईलसह १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.११ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पथकाने आरोपीला घरातून ताब्यात घेतले. झडतीत एक लोखंडी तलवार आणि एक कोयता मिळाला. आरोपीच्या मोबाईल तपासात त्याने 'टॅक्टॉय' या ऑनलाईन साइटवरून तीन चाकू मागवल्याचे आढळले. तातडीने पथकाने भुमीपुत्र कॉलनी येथील ब्लु डार्ट कार्यालयातून ते चाकू जप्त केले. यापूर्वीही आरोपीने दोन चाकू मागवले असल्याचे निष्पन्न झाले.आरोपीसोबतच राजस्थानमधील पाठवणारा भारत नवजी, शिपर कंपनीचे मालक, गुरूग्राम येथील ब्लु डार्ट सिक्युरिटी मॅनेजर व अमरावतीतील शाखा व्यवस्थापकाविरुद्ध राजापेठ पोलिस ठाण्यात आर्म अॅक्ट व एमपीडीएखाली गुन्हा दाखल झाला आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलिसांनी नागरिकांना अवैधरित्या शस्त्रे विकत न घेण्याचे आवाहन केले आहे.

# खाद्यपदार्थ तपासणी; आठ दुकानांतील नमुने घेतले

### सणांच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषधी प्रशासन ऍक्टिव्ह मोडवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १२ अमरावती**



सण–उत्सवाच्या दिवसांत ग्राहकांना सुरक्षित आणि शुद्ध अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषधी प्रशासन विभागाने अमरावतीत विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत शहरातील विविध भागातील आठ दुकानांमधून खाद्यपदार्थांचे नमुने संकलित करण्यात आले.

सातुर्णा व राजापेठ चौकातील 'रघुवीर मिठाईयाँ' आणि 'वैष्णवी फुड प्रॉडक्ट्स'सह इतर आस्थापनांवर अधिकाऱ्यांच्या पथकाने धाड टाकून मिठाई व इतर अन्नपदार्थांचे एकूण आठ नमुने तपासणीसाठी घेतले.

या मोहिमेत अन्न व औषधी प्रशासन, जिल्हा दुग्ध विकास विभाग, जिल्हा पशुसंवर्धन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिका व पोलीस विभाग यांचे अधिकारी सहभागी झाले होते. सह आयुक्त स. द. केदारे व साहाय्यक आयुक्त भा. की. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे, घ. प. दंदे, दुग्ध विकास विभागाचे विनोद पाठक, उपायुक्त डॉ. संजय कावरे आणि पशुधन विकास अधिकारी डॉ. तुषार गावंडे यांनी प्रत्यक्ष तपासणी करून नमुने गोळा केले.साहाय्यक आयुक्त चव्हाण यांनी सांगितले की, ऑगस्ट ते डिसेंबरदरम्यान ही विशेष मोहीम सातत्याने राबविली जाणार आहे. सर्व खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अन्न तयार करताना स्वच्छता व शुद्धतेची काळजी घ्यावी. तसेच ग्राहकांनी दुग्धजन्य पदार्थ फ्रिजमध्ये साठवून २४ तासांच्या आत त्यांचे सेवन करावे, असेही त्यांनी आवाहन केले.

# शेगाव नाका, नवसारी परिसरातील व्यावसायिकांना आठ हजारांचा दंड

### महापालिकेची प्रतिबंधित प्लास्टिक व डस्टबीन तपासणी मोहीम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

शेगाव नाका ते नवसारी चौक या परिसरात सोमवारी प्लास्टिक जप्ती व दंडात्मक कारवाईची मोहीम राबविण्यात आली. यावेळी व्यावसायिकांकडून आठ हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

सदर मोहिमेत २० आस्थापना, हातगाडीवाले, भाजीपाला व फळ विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान पाच आस्थापनांमध्ये डस्टबिन नसल्याचे आढळून आल्याने त्यांना दंड आकारण्यात ४, आला. त्यामध्ये ओंकार कॅफे ५०० रुपये, वैभव यावले १ ह सुनंदा सरदार ५०० रुपये, प्रकाश तायडे ५०० रुपये, सुधीर कॅफे ५०० रुपये, तसेच रमेश किराणा स्टोअर्स या दुकानात प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळल्याने त्यांच्यावर ५ हजारांचा दंड ठोठावण्यात आला. या कारवाई पथकात वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक आर. के. डिक्याव, प्लास्टिक पिशवी जप्ती पथकप्रमुख विक्की जैदे, स्वच्छता निरीक्षक विनोद टांक, मिथून उसरे, प्रवीण उसरे, इम्रान खान, निखिल खंगाळे, सचिन सैनी, प्रसाद कुळकर्णी आणि अनिकेत महल्ले यांचा समावेश होता.

# महापालिकेचा प्रस्तावित हॉकर्स झोन फेरीवाल्यांना धक्का; आयुक्तांच्या बैठकीत व्यक्त झाला तीव्र रोष

### स्थान ठरविण्यात पारदर्शकता नसल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**



वाहतुकीला अडथळा यावा, यासाठी महापालिका प्रशासनाने २६ ठिकाणे हॉकर्स झोन म्हणून प्रस्तावित केली आहे; मात्र व्यवसायाच्या दृष्टीने ही ठिकाणे व्यवहार्य नसल्याचे सांगून फेरीवाल्यांनी ही ठिकाणे मान्य नसल्याचे सांगितले. तसेच त्यांनी आयुक्त सौम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेतील बैठक अर्धवट सोडून नाराजी व्यक्त केली. आयुक्तांच्या अध्यक्षतेत शहरफेरीवाला समितीची बैठक सोमवारी सायंकाळी महापालिकेत पार पडली. त्यामध्ये फेरीवाल्यांसाठी प्रस्तावित करण्यात आलेले २६ हॉकर्स झोन व व्यवसायासाठी बंदी असलेलेल्या रेड झोनचीही माहिती फेरीवाल्यांच्या प्रतिनिधींना देण्यात आली; मात्र या हॉकर्स झोनसाठी फेरीवाल्यांच्या प्रतिनिधींचे एकमत झाले नाही. तसेच शहर फेरीवाला समितीमधील सदस्यांना हे झोन नाकारण्याचा अधिकार असल्याचादावा फेरीवाल्यांचे प्रतिनिधी गणेश मारोडकर यांनी केला. आयुक्तांनीही रोखठोक भूमिका घेतल्याने अखेर फेरीवाल्यांच्या प्रतिनिधींनी बैठक अर्धवट सोडली. तसेच बैठकीतून बाहेर पडल्यावर उपस्थित सर्व फेरीवाल्यांनी गुरुवार, १४ ऑगस्ट रोजी कुटुंबीयांसह महापालिकेत आत्मदहन आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता या विषयावरून फेरीवाला विरुद्ध प्रशासन असा संघर्ष पेटण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. बैठकीत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त मेघना वासनकर, बाजार परवाना अधीक्षक दीपक खडेकर, महापालिकेच्या पाचही झोनचे साहाय्यक आयुक्त, पोलीस अधिकारी व फेरीवाल्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

> सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, अशा पद्धतीनेच हॉकर्स झोन निश्चित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार काही जागा प्रस्तावित करण्यात आल्या आहे, मात्र फेरीवाले त्यांच्या नियोजित ठिकाणांवरच अडून बसले आहे. त्यामुळे त्यांन लेखी स्वरूपात झोनची यादी देण्याची सूचना आयुक्तांनी केली. तसेच नागरिकांना किंवा खासगी भूखंड मालकांनाही फेरीवाल्यांसाठी खुली जागा सूचविण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.
>
> **शिल्पा नाईक, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.**

# महाराष्ट्रात १५ हजार पोलिसांची भरती
## कर्ज योजनांतील जामीनदाराची अटही शिथिल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत दोन महत्त्वाचे निर्णय घेतले. राज्यात तब्बल १५ हजार पोलिसांची भरती करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली असून, विविध कर्ज योजनांतील जामीनदाराची अटही शिथिल करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून पोलिस भरतीसाठी वाट पाहत असलेल्या हजारो तरुणांचे स्वप्न यामुळे पूर्ण होणार आहे. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, कोणत्या जिल्ह्यात किती भरती होईल, याची माहिती लवकरच जाहीर होईल. त्यानंतर जाहिरात प्रसिद्ध करून भरती प्रक्रिया सुरू करण्यात येईल.




मंत्रिमंडळ बैठकीनंतर कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांनी कर्ज योजनांबाबत घेतलेल्या निर्णयाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, एक ते दोन लाख रुपयांचे कर्ज घेणाऱ्या लाभार्थ्यांना यापुढे शासकीय कर्मचाऱ्यांचा जामीनदार आवश्यक राहणार नाही. तसेच एनएसएफडीसी किंवा महामंडळांकडून पुरविल्या जाणाऱ्या कर्जासाठी शासनाकडून जी हमी दिली जाते, त्या हमीची मुदत पाच वर्षांनी वाढवण्यात आली आहे.

या निर्णयामुळे एनएसएफडीसीचे प्रलंबित ११,२९४ कर्जदार आणि ३०,११९ प्रलंबित प्रकरणांना मोठा दिलासा मिळणार आहे. सरकारच्या या पावलामुळे सर्वसामान्य घटक आणि मागासवर्गीयांना कर्ज मिळवणे अधिक सुलभ होईल.सरकारच्या या दुहेरी निर्णयामुळे रोजगार आणि आर्थिक सहाय्य या दोन्ही आघाड्यांवर राज्यातील नागरिकांना फायदा होणार आहे.

# पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीस संत गाडगेबाबा नाव द्या - तेजस अभ्यंकर
## १४ ऑगस्टला 'उडी मार' आंदोलन करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अं.सुर्जी**

कर्मयोगी संत गाडगे महाराजयांचे जन्मभूमी असलेला तालुक्यातील नवीन तयार झालेल्या पंचायतसमिती इमारतीला संत गाडगे महाराज प्रशासकीय इमारत असे नाव देण्याबाबत निवेदनाद्वारे मागणी केली.

मागणी मंजूर करत मान्यतेस पाठविल्यावर शासनाच्या जीआरचा दाखला देत जिल्हापरिषद प्रशासनाकडून संत असलेल्या गाडगेबाबा यांना मान्यवरांचे सूचीत बसवून नाव न देण्याचे जिल्हापरिषद प्रशासनाचा निर्णय असल्याने आंदोलनकर्त्यांनी १४ ऑगस्टला 'उडी मारो' आंदोलनावर ठाम राहण्याचा पवित्रा घेतला आहे.




नवीन पंचायतसमितीच्या प्रशासकीय इमारतीस संत गाडगे महाराज प्रशासकीय इमारत हे नाव देण्यात यावे, यासाठी तेजस अभ्यंकर व सुनिल राक्षसकर हे २४ फेब्रुवारीला पंचायत समिती प्रांगणामध्ये आमरण उपोषण बसले होते.

उपोषण मागे घेण्याकरिता लेखी स्वरुपात आश्वासन दिल्यावर तत्कालीन गटविकास अधिकारी श्रीकृष्ण खातळे यांनी २४ फेब्रुवारी रोजी पंचायतसमितीची मासिक सभा बोलावून त्या सभेमध्ये उपोषणातील मागणी मंजूर करून अंतिम मान्यतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. अमरावती यांना पाठविला असता जिल्हापरिषद प्रशासनामार्फत शासनाचे परिपत्रक ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक जिपअ/२०२३ प्रत्र/१३४/परा८-२५/दिनांक ५ मे २००४ मधील मुद्दा क्रमांक (तीन) नुसार जिल्हापरिषदेच्या अखत्यारीतील मालमत्तांना भविष्यात कोणत्याही मान्यवराचे नाव देण्यास मनाई करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे, तसेच जि.प. अखत्यारीत येणाऱ्या रस्ते व पुलांना व जिल्हापरिषद अंतर्गत विविध मालमत्तांना मान्यवरांची नाव न देण्यात यावे, असे स्पष्ट नमूद असल्याचे आंदोलकांना सुचविण्यात आले; परंतु आंदोलनकर्ते तेजस अभ्यंकर यांनी संत गाडगे महाराजांना हेतूपुरस्सर मान्यवर असा उल्लेख करुन आपण त्यांचा अपमान व अवहेलना केली आहे.

पंचायतसमितीच्या ठरावानुसार नवीन प्रशासकीय इमारतीला संत गाडगे महाराज प्रशासकीय इमारत पंचायतसमिती अंजनगाव सुर्जी असे नाव आपण - येणाऱ्या १४ ऑगस्टपर्यंत न दिल्यास आपल्या पंचायतसमिती कार्यालयाच्या इमारतीवर चढून 'उडी - माथे' आंदोलन करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी आपली व प्रशासनाची राहील, असा इशारा दिला असून होउ घातलेल्या 'उडी मारो' आंदोलनाला काय वळण लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रानडुकराच्या हल्ल्यात गुराखी गंभीर जखमी
## शिरजगाव कोरडे शेतशिवारातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२चांदूर रेल्वे**

शेळ्या चारताना अचानक रानडुकराने गुराख्यावर हल्ला केल्याची घटना चांदूररेल्वे तालुक्यातील शिरजगाव कोरडे शेतशिवारात शुक्रवार ८ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजताच्या दरम्यान घडली. यामध्ये गुराखी दिलीप भीमराव सोनसाखळे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे.

शिरजगाव कोरडे येथील दिलीप सोनसाखळे यांचा शेळीपालनाचा व्यवसाय असून ते रोज शेळ्या चारायला घेवून जातात. घटनेच्या दिवशी नेहमीप्रमाणे ते शेळ्या चारायला शिरजगाव कोरडे शेत शिवारातील गावतलावाजवळच्या रानात गेले होते. दुपारी ३ वाजताच्या दरम्यान अचानक रानडुकराने त्यांच्यावर पाठीमागून हल्ला केला. यामध्ये ते



गंभीर जखमी झाले. त्यांच्या उजव्या मांडीला व डावा पायाला गंभीर जखम झाली. सुदैवाने थोड्या वेळानंतर त्याच रस्त्यावरून त्या शिवारातील शेतकरी सुधाकर बुटे व दिलावरपूरच्या एका व्यक्तीला दिलीप गंभीर जखमी अवस्थेत पडलेले दिसले. त्यांनी ही बाब त्वरित गावात जाऊन सांगितली गावातील युवकांनी त्वरित मोटर सायकलने घटनास्थळ गाठले. त्यांनी जखमी दिलीपला चांदूर रेल्वे ग्रामीण रूग्णालयात भरती केले. त्यांची प्रकृती बघता त्यांना पुढील उपचासुसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहे. दिलीप सोनसाखळे हे गरीब असून पत्नी व एक मुलगा असा त्यांच्या संसार आहे. त्यांच्या कुटुंबियांनी या घटनेची माहिती चांदूररेल्वे पोलिसस्टेशनला दिली, तसेच ऑनलाईन अर्ज दाखल केला चांदूररेल्वे वनविभागाकडे लेखी व आहे. शासनाने त्यांना लवकर आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

# बालगृहाशेजारी रस्त्यावरच गुरा-ढोरानी मांडले ठाण
## सर्वत्र घाणीचे साम्राज्य, चिमुकल्यांसह नागरिकांचेही आरोग्य धोक्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर**

दर्यापूर येथील श्री संत गाडगे महाराज बालगृहाच्या शेजारीच भर रस्त्यावर गुरा-ढोरांना त्यांचे मालक बांधून ठेवतात. परिणामी या परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य असून त्यामुळे बालगृहातील चिमुकल्यांसह परिसरातील नागरिकांचेही आरोग्य धोक्यात आले आहे.

बालगृहाशेजारीच असलेल्या सिमेंटच्या रस्त्यावर गुरा-ढोरांची रेलचेल राहत असल्यामुळे हा रस्ता वाहतुकीसही बंद आहे: या कारणावरून अनेकदा वादही होतात. वाहनचालक जीव मुठित घेवून कसेतरी वाहने काढतात परिसरातील नागरिकांनी अनेकदा न.प. कडे याबाबततक्रारी केल्या. आरोग्य विभागाचे अधिकारी येतात, त्यावेळी काही काळासाठी का होईना रस्ता साफ होतो: मात्र लगेच परिस्थिति जैसे थे' होते. अखेर बालगृहाच्या माजी विद्यार्थ्यांनी १४ ऑगस्टपासून उपोषण करण्याचा निर्धार करताच न.प.ला जाग आली. थातूरमातूर कारवाई झाली: मात्र आहे. त्यामुळे भर पावसाळ्यात अद्यापही गुरांची समस्या कायमच या परिसरात उग्र वास पसरतो त्याचा फटका आता चिमुकल्यांना बसत आहे.

# विदर्भ राज्य आंदोलन समितीची बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर**

विदर्भ केसरी कार्यालय दर्यापूर येथे ७ऑगस्टला विदर्भ राज्य आंदोलन समिती कार्यकारिणी बैठक जिल्हाध्यक्ष सुनील पाटील साबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीमध्ये तालुका कार्यकरिणीची समिती गठित करण्यात आली. महावितरणने जुने मीटर बदलून नवीन प्रीपेड मीटर लावण्याचा सपाटा लावला आहे. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.महावितरणने ग्राहकांना प्रीपेड मीटरची सक्ती करू नये,असा ठराव घेण्यात आला असून जर महावितरणने प्रिपेड मीटर सक्ती केल्यास वि. रा. आ. समिती उग्र आंदोलन करणार, असे उपअभियंता महावितरण दर्यापूर कार्यालयात निवेदन देण्यात आले. कारण महाराष्ट्रामध्ये विजेचे दर खूपच जास्त प्रमाणात असल्यामुळे ग्राहक त्यामध्ये होरपळून निघत आहे.या बैठकीत निखिल भायने तालुकाध्यक्ष युवा आघाडी दर्यापूर, रवींद्रसिंह ठाकूर, विष्णुदास काळमेघ, अशोक राणे, अरुण पाटील साबळे, भाऊराव राणे, उमेश भांगे, संदीप बुध, शंकर कळस्कर, दीपक केडिया, प्रथमेश बुध, गौरव बुध, ऋषिकेश काळे, गणेश बुध. अक्षय काळे आदी उपस्थित होते.

# महिला महाविद्यालयात राखी मेकिंग वर्कशॉप
## विद्यार्थ्यांकडून पर्यावरणपूरक राख्यांचे प्रदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय, जोग चौक यांच्या वतीने राखी पौर्णिमेनिमित्त ७ ऑगस्ट रोजी महाविद्यालय तसेच महेंद्र कॉलनी येथील श्री संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यामंदिर येथे राखी मेकिंग वर्कशॉप आयोजित करण्यात आले. गृह अर्थशास्त्र व वाणिज्य विभागांतर्गत घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना घरगुती साहित्य वापरून कमी खर्चात पर्यावरणपूरक राख्या तयार करण्याचे तसेच त्यांचे विपणन करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.



विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रकारच्या राख्या तयार केल्या. ८ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या राख्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनीचे उद्घाटन नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे सहसचिव मा. श्री. प्रदीप पात्रीकर यांच्या हस्ते, सचिव श्री. हितेश व्यास व प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर यांच्या उपस्थितीत झाले.या उपक्रमासाठी प्रा. ईशा नरोटे, प्रा. अपर्णा तीनखेडे, प्रा. कांचन परतेकी, प्रा. ममता पांडे व पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते यांनी विशेष परिश्रम घेतले. यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेच्या कार्यकारिणीने अभिनंदन केले आहे.

# पर्युषण पर्व काळात मांसाहार विक्री व कत्तलखाने बंद ठेवावेत - जैन समाजाचे मनपा आयुक्तांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

समस्त जैन श्वेतांबर समाजातर्फे २० ऑगस्ट ते २७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत श्रद्धा, उत्साह आणि धार्मिक वातावरणात पवित्र पर्युषण पर्व साजरे होणार आहे. धर्माराधना, तप, संयम व सदाचार यांचा संदेश देणाऱ्या या पवित्र पर्वानिमित्त जैन समाजाने अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त सौ. शर्मा यांना निवेदन सादर केले.

या निवेदनात २० ते २७ ऑगस्ट २०२५ दरम्यान शहरातील मांसाहार विक्री केंद्रे तसेच मुक प्राण्यांची कत्तल पूर्णपणे बंद ठेवावी आणि यासंदर्भातील शासन आदेशाची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. आयुक्तांनी निवेदन स्वीकारून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.हे निवेदन श्री ओसवाल संघ, श्री ओसवाल नवयुवक संघ, श्री जैन श्वेतांबर मित्र मंडळ, श्री दादावाडी संस्था, श्री वर्धमान स्थानकवासी संघ, श्री अंबापेठ स्थानकवासी संघ, श्री जैन श्वेतांबर मोठा मंदिर आदी विविध संस्थांच्या लेटरहेडवर सादर करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन ओसवाल नवयुवक संघ, अमरावतीतर्फे करण्यात आले असून, अध्यक्ष ॲड. रोहित जैन यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्प संचालक पियूष गुणवंत राज कोठारी यांनी विशेष प्रयत्न केले आणि सर्व संस्थांना या उपक्रमासाठी आवाहन केले.कार्यक्रमाला विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात अनिल बोथरा, संजय अचलिया, भारत खजांची, राजेंद्र बुच्चा, सुशील जैन, सुदर्शन चोरडिया, गुणवंत कोठारी, पियूष कोठारी, शीतल भंसाली, किरणजी समरा, मनीष सावला, अजय बोकरिया, सागर शाह, कल्पेश बोथरा, आगम शाह, महावीर कटारिया, रोमित पारेख, सतीश सराफ, अनीश शाह, भरत भयानी, कल्पेश देसाई, अभिजित शाह व सौ. साधना कोठारी यांचा विशेष सहभाग होता.

# विदर्भस्तरीय दहीहंडी 'ऑपरेशन सिंदुर'ला समर्पित
## अमरावतीत १७ ऑगस्ट रोजी होणार भव्य आयोजन; लाखो नागरिकांच्या उपस्थितीची अपेक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

भारतीय जनता पार्टी आणि युवा स्वाभिमान पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी नवाथे चौक येथे होणारी विदर्भस्तरीय दहीहंडी स्पर्धा 'ऑपरेशन सिंदुर'ला समर्पित करण्यात आली आहे. पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या कृत्याचा बदला घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या 'ऑपरेशन सिंदुर' या शौर्यपूर्ण कारवाईला सलाम करण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे.

आमदार रवी राणा आणि माजी खासदार सौ. नवनीत रवी राणा यांच्या संकल्पनेतून ही दहीहंडी स्पर्धा आयोजित होत असून, भाजपा आणि युवा स्वाभिमान पार्टीचे १,००० स्वयंसेवक तयारीत गुंतले आहेत. पहिल्या पारितोषिकासाठी ५ लाख रुपये, दुसऱ्यासाठी ३ लाख रुपये, तर तिसऱ्यासाठी २ लाख रुपये ठेवण्यात आले आहेत. सहभागी प्रत्येक गोविंदा पथकाला प्रोत्साहनपर रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धाया ठिकाणी ग्रुप आणि सोलो डान्स स्पर्धाही होणार आहे. ग्रुप डान्ससाठी पहिले पारितोषिक ११,००० रुपये, दुसरे ७,००० रुपये, तिसरे ५,००० रुपये तर सोलो डान्ससाठी पहिले ३,१०० रुपये, दुसरे २,१०० रुपये आणि तिसरे १,१०० रुपये ठेवण्यात आले आहे. सर्व सहभागींना प्रमाणपत्र व प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाईल. लहान मुलांसाठी राधा-कृष्ण सजावट स्पर्धेचे आयोजनही आहे.नोंदणीसाठी युवा स्वाभिमान पार्टीचे मुख्य कार्यालय, राजापेठ, अमरावती येथे सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत उपस्थित राहता येईल.

**मान्यवर व कलाकारांची उपस्थिती**

या दहीहंडीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, तसेच अनेक आमदार, भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.सुप्रसिद्ध कलाकार अर्जुन कपूर, रणदीप हुड्डा, आदित्य रॉय कपूर, सिद्दार्थ जाधव, तमन्ना भाटिया, 'पुष्पा' फेम अजय मोहिते आदी उपस्थित राहून रंगत वाढवतील.

भव्य स्टेज व सुविधा५१ फूट उंच दहीहंडी फोडण्यासाठी विदर्भातील नामवंत गोविंदा पथके सहभागी होणार आहेत. १२ फूट उंच, ३० फूट रुंद व ६० फूट लांब असा दोन टप्प्यातील मुख्य स्टेज, तसेच १६ फूट रुंद व ३० फूट लांब रॅम्प उभारण्यात येणार आहे. महिलांसाठी स्वतंत्र आसनव्यवस्था, अग्निशमन दलाच्या गाड्या, रुग्णवाहिका, हायड्रा क्रेन, आकर्षक ध्वनी प्रणाली व डी.जे. सिस्टमची सुविधा उपलब्ध असेल.

सामाजिक बांधिलकीया मंचावर गरजू विद्यार्थी, निराधार महिला, बेरोजगार युवकांना मदतीचा हात देण्यात येणार असून, बेघर महिलांना घरांच्या चाव्या वाटल्या जातील. माजी सैनिक, क्रीडापटू व समाजसेवकांचा सन्मान केला जाईल.

# एकत्र येऊ देशासाठी - हर घर तिरंगा रॅलीत हजारो विद्यार्थी सहभागी







आज १२ ऑगस्ट, दुपारी ४ वाजता, नेहरू मैदान ते पोलीस कवायत मैदान, अमरावती.अशी हर घर तिरंगा रॅली काढण्यात आली .या रॅलीत नागरिक, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, व्यापारी, स्वयंसेवी संस्था व विविध संघटना मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या अमरावती महानगरपालिकेच्या वतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

# अमरावती महानगरपालिकेची स्वातंत्र्य दिनासाठी जोरदार तयारी; शहर तिरंगामय



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला अमरावती महानगरपालिकेतर्फे शहरभर देशभक्तीचा उत्साह ओसंडून वाहत आहे. महापालिकेच्या मुख्य इमारतीसह विविध मनपा कार्यालये, मार्केट, मॉल आदी ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाईने झगमगाट करण्यात आला आहे. प्रकाशाच्या मनमोहक सजावटीने शहरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले असून, संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्त मनपा इमारतीवर विशेष लायटिंगची सोय करण्यात आली असून, रात्रीच्या वेळेस ही सजावट विशेष उठून दिसत आहे. हर घर तिरंगा या केंद्रीय मोहिमेच्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिका नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आणि भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल व्यक्तिगत नाते दृढ करण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहे.

ही मोहीम दि. ०२ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झाली असून, दि. १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत तीन टप्प्यात पार पडणार आहे. या कालावधीत शाळा, महाविद्यालये, समाजसंस्था आणि स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रभात फेऱ्या, तिरंगा रॅली, चित्रकला स्पर्धा, देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा यांसारखे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

शहरातील प्रमुख चौक, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे तिरंग्यांनी सजविण्यात आली असून, नागरिकांमध्येही मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून येत आहे. अनेक घरांच्या, दुकाने व इमारतींच्या माथ्यावर तिरंगा फडकत आहे.महानगरपालिका प्रशासनाने आवाहन केले आहे की, नागरिकांनी उत्साहात सहभाग घेताना शिस्त आणि स्वच्छतेची काळजी घ्यावी, तसेच राष्ट्रध्वजाचे सन्मानपूर्वक प्रदर्शन करावे.यंदाचा स्वातंत्र्यदिन तिरंगा मय सजावटीत आणि नागरिकांच्या जोशात साजरा होणार असल्याची खात्री शहरभर पसरली आहे.

# दर्यापूर बस आगारात नामफलकांचा अभाव युवासेना जिल्हाप्रमुख देणार पाट्या दान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२दर्यापूर**

दर्यापूर बस आगार मधिल बसेस ना गेली कित्येक महीन्यांपासुन नामफलकच नाहीत. दर्यापूर बस स्थानक हे नेहमीच समस्यांच्या विळख्यात असते. दर्यापूर स्थानकाला नविन इमारत मिळाली, नविन बसेस मिळाल्या परंतु स्थानकामध्ये नेहमीच समस्यांचा अभाव पाहायला मिळत आहे. स्थानकाचा दौरा केला असता जास्तीत जास्त बसेस ना गावांच्या नावाची पाटीच दिसत नाही. त्यामुळे गाडी कुठे जाणार हे प्रवास्यांना कसे कळणार हा प्रश्न आहे? दिवसभर बस कंट्रोलर बिचारे प्रवाशांना सांगुन सांगुन वैतागुन जातात.बरेचदा बसला पाटी नसल्याने प्रवासी वाट पाहत बसतात अन् बस निघून पण जाते



तर माहीत होत नाही. बस चालक व वाहक सुद्धा बसला पाटी नसल्याने प्रवाशांना सांगुन सांगुन शेवटी चिडुन जातात. काही चालक तर चक्क बस च्या काचावर चुण्याने गावाचे नाव लिहुण बस नेतांना दिसतात. दर्यापूर बस आगार हे अमरावती जिल्ह्यातील चांगल्या कमाईचे आगार म्हणून ओळखले जाते. नुकत्याच झालेल्या पंढरपूर यात्रेकरिता अतिरिक्त बसेस सोडल्या होत्या त्यामध्ये पण लाखोंची कमाई आगाराने केली परंतु ऐवढी कमाई असतांनाही साध्या पाट्या सुद्धा आगार व्यवस्थापक तयार करु शकत नाही हि लाजिरवाणी बाब आहे. अशा समस्या घेऊन काही प्रवाशी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना अमरावती जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांच्या कडे गेले असता त्यांनी आश्वासन दिले कि लवकरच बसेस ला पाट्या लावण्याकरिता आपण आगार च्या अधिकार्यांसोबत चर्चा करु त्यांनी जर काही दिवसांत पाट्या लावल्या नाहीत तर अंकुश पाटील कावडकर हे स्वतः दारिद्र्यात असलेल्या दर्यापूर आगाराला बसेस च्या पाट्या दान देऊन तिव्र स्वरूपाचे आंदोलन करु अशी माहीती युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

# ‘एचएसआरपी’साठी अतिरिक्त शुल्क नागपुरात दोन केंद्रांवर कारवाई




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नागपूर**

उच्च सुरक्षा क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसवण्यासाठी नागपुरातील काही केंद्रांवर ५० रुपये अतिरिक्त शुल्क वसूलले जात असल्याचे समोर आले आहे. काही केंद्रांवर या पाटीला सुरक्षा आवरण लावण्याच्या नावावर ३०० ते ४०० रुपये अतिरिक्त घेतले जात आहेत.

‘एचएसआरपी’ बसवण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंतची अखेरची मुदत आहे. त्यामुळे मुदतीच्या आधी पाटी लावण्यासाठी गर्दी वाढत आहे. त्याचा गैरफायदा घेत ५० रुपये अतिरिक्त घेतले जात आहेत. परंतु, याबाबत कुणीही लेखी तक्रारी करीत नसल्याचा गैरफायदा केंद्रचालकांकडून उचलला जात आहे.

दरम्यान, नवीन पाटी कमकुवत असून ती काही दिवसांतच तुटण्याचा धोका असल्याचे सांगत ३०० ते ४०० रुपयांचे सुरक्षा आवरण घेण्याचा आग्रहही केंद्रचालकांकडून धरला जात आहे. नागपुरात दोन

**शुल्काच्या नावावर कोणतेही अतिरिक्त शुल्क केंद्र चालकाला घेता येत नाही. नागपुरातील नितीन गिरी यांनी दाभा परिसरातील एका केंद्रावर ५० रुपये अतिरिक्त घेतले जात असल्याची तक्रार केल्यावर या केंद्रावरील काम थांबवले आहे.**

**– अमिर हुसेन, रोझमेर्टा सेफ्टी सिस्टम्स लिमिटेड, नागपूर.**

केंद्रांबाबत तक्रारी आल्यावर एकाची मान्यता रद्द करण्यात आली तर दुसऱ्या केंद्रावरील काम थांबवण्यात आले.

राज्यात शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार दुचाकी वाहनांसाठी सर्व कर व शुल्कासह (मोटारसायकल, स्कूटर, ट्रॅक्टर) ५३१ रुपये, तीन चाकी (ऑटो-रिक्षा) ५९० रुपये, चारचाकी आणि मोठी वाहने (कार, बस, ट्रक, टेम्पो) ८७९ रुपये इतका दर आकारण्यात आला आहे.

# संजय गायकवाड यांची उद्धव ठाकरेंवर वादग्रस्त टीका; काही तासांत घेतला यूटर्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नागपूर**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिलेदार गेल्या महिन्यापासून विविध कारणांनी वादाच्या भोवऱ्यात सापडत आहेत. याच पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेवर केलेल्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे.गायकवाड यांना ठाकरे गटाच्या आंदोलनाबाबत प्रश्न विचारला असता, त्यांनी म्हटले की, उबाठाच्या वतीने करण्यात आलेले आंदोलन हा पक्ष राहिला नाही. त्यांच्याकडे आता काही काम उरलेलं नाही. ते माझी कॉपी करू शकत नाहीत, कारण मी ओरिजनल आहे. इतकंच नव्हे, तर उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या बापालाही माझी कॉपी करणं शक्य नाही.या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. बाळासाहेब ठाकरे यांचा उल्लेख अशा पद्धतीने केल्याबद्दल ठाकरे गटाकडून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. यानंतर काही तासांतच गायकवाड यांनी यूटर्न घेतला. उद्धव यांचे ते वडील असले तरी विचाराने बाळासाहेब आमचे बाप आहेत. माध्यमांनी माझ्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ घेतला, असा खुलासा त्यांनी आज केला.गेल्या काही दिवसांत महायुती सरकारमधील मंत्री योगेश कदम, माणिकराव कोकाटे, तसेच आमदार संजय शिरसाट आणि संजय गायकवाड यांच्यासह काही नेत्यांवर विविध आरोप होत आहेत. यामुळे वादग्रस्त आणि कलंकित मंत्र्यांविरोधात काल उद्धव ठाकरे गटाने महाराष्ट्रभर ‘जनआक्रोश आंदोलन’ केले. या आंदोलनादरम्यान काहींनी लुंगी-बनियन परिधान केली, काहींनी पत्ते खेळले तर एकाने नाच करून सरकारवर टीका केली. या आंदोलनावर टीका करतानाच गायकवाड यांच्या तोंडून वादग्रस्त विधान बाहेर पडले आणि त्यावरून नवा राजकीय वाद पेटला आहे.

# शिरखेड पोलीसांची धाड; १.५४ लाख रुपयांसह १३ जुगाऱ्यांवर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मोर्शी**

शिरखेड पोलीसांनी ग्राम धामणगाव येथील एका बंद घरात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर भजन मंडळीचा वेष धारण करून टाकलेल्या धाडीत १३ जुगाऱ्यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून १,५४,९५० रुपये रोख, मोबाईल, मोटरसायकल व जुगार साहित्य जप्त करण्यात आले.ठाणेदार सचिन लुले यांना काही दिवसांपासून गावात जुगार सुरु असल्याची माहिती मिळत होती. मात्र, जुगाऱ्यांचे खबरे गावाच्या वेशीवर असल्याने पोलीसांना थेट कारवाई करणे अवघड झाले होते. ११ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजता मिळालेल्या पक्क्या माहितीनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या आदेशानुसार पथकाने पायी गावात प्रवेश करत छापा टाकला.सदर कारवाईत १३ आरोपींवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामध्ये रुपेश गावंडे, संतोष गावंडे, मोहन बरडे, विक्की कनेर, रविंद्र आकोलकर, योगेश झगडे, देवेंद्र मानकर, रुपेश ढाकुलकर, विजय भुजाडे, मनोज वैराळे, विनोद वैराळे, सुनील सुंदरकर व प्रज्वल अमृते (सर्व रा. धामणगाव काटसुर) यांचा समावेश आहे.

कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सचिन लुले यांच्या नेतृत्वात पार पडली. पथकात उपनिरीक्षक धुर्वे, पोहेकॉन्स्टेबल सचिन भाकरे, निस्ताने, वैभव घोगरे, अमित राऊत, मयुर कापडे व धीरज डोंगरे यांचा सहभाग होता.

# गट-अ, गट-ब, ची विभागीय चौकशी आता कंत्राटी अधिकाऱ्यांकडे सोपवणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

राज्य शासनाच्या गट-अ आणि गट-ब संवर्गातील एकच असलेल्या अपचारी विभागीय चौकशी प्रकरणांचा निपटारा लांबणीवर पडू नये म्हणून शासनाने ही प्रकरणे आता कंत्राटी तत्त्वावरील चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सामान्य प्रशासन विभागाने ७ऑगस्ट २०२५ रोजी शासन आदेश जारी केला असून, तो १ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.



या निर्णयानुसार, ज्या विभागीय चौकशी प्रकरणांत अद्याप चौकशी अधिकारी नियुक्त नाहीत, अशी प्रशासकीय अनियमिततेची प्रकरणे कंत्राटी चौकशी अधिकाऱ्यांकडे दिली जाणार आहेत. मात्र, प्रशासकीय अनियमिततेव्यतिरिक्त लाचलुचपत, आर्थिक अपहार, शासनाचे आर्थिक नुकसान यांसारखी गंभीर प्रकरणे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांकडेच राहतील.

कंत्राटी तत्त्वावरील चौकशी अधिकाऱ्यांची महसुली विभागनिहाय यादी तसेच त्यांच्याकडे सुरू असलेल्या चौकशी प्रकरणांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांच्याकडे किती प्रकरणे सुरू आहेत, त्याबाबतची माहिती घेऊन ज्या चौकशी अधिकाऱ्यांकडे १२ प्रकरणांच्या मर्यादेत, कमीत कमी चौकशी प्रकरणे सुरू असतील, त्यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करावे, असे शासनाचे निर्देश आहेत.

# प्राचीन रामदेव महाराज मंदिरातील मूर्तींची तोडफोड; विश्वस्तांना अटक व कारवाईची हिंदुत्वनिष्ठ संघटनांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

शहरातील प्रभात चौकाजवळील प्राचीन रामदेव महाराज मंदिरातील शिवलिंग, गणेश व नंदी महाराज यांच्या मूर्तींची तोडफोड करून त्यांचे विसर्जन केल्याच्या प्रकारामुळे धार्मिक वातावरण ढवळून निघाले आहे. या घटनेच्या निषेधार्थ अमरावतीतील विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी एकत्र येत पोलीस आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन संबंधित विश्वस्तांवर तात्काळ गुन्हा नोंदवून अटक करण्याची मागणी केली आहे.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अंदाजे दीडशे वर्षांपूर्वी बांधलेले हे मंदिर अमरावतीतील सर्वात जुन्या मंदिरांपैकी एक असून येथे श्री रामदेव बाबा यांची समाधी, भगवान श्रीराम, माता सीता, भगवान लक्ष्मण, श्री हनुमान राय, श्री गणेश, महादेवाचे शिवलिंग आणि नंदी महाराज यांच्या मूर्ती स्थापित होत्या. मात्र, श्रावण महिन्यात ‘जीर्णोद्धार’च्या नावाखाली विश्वस्तांसह काही जणांनी हातोडा-छिन्नीने मूर्तींचा विध्वंस केला.

रविवार, १० ऑगस्ट २०२५ रोजी सुट्टीचा फायदा घेत मंदिरातील शिवलिंग, गणेश व नंदी महाराज यांच्या मूर्ती तोडण्यात आल्या व विसर्जन करण्यात आले. यावर आक्षेप घेणाऱ्यांना धमक्या देण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. तसेच, श्री रामदेव महाराजांच्या समाधीला तोडण्याचाही प्रयत्न सुरू असून मंदिर पूर्णपणे भुईसपाट करून त्या जागेवर व्यावसायिक इमारत उभारण्याचा कट असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या कृतीमुळे श्रावण मासात भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून, संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून विश्वस्तमंडळाचा आर्थिक हिशोब पडताळणे, धर्मदाय विभागाच्या माध्यमातून कारवाई करणे, उभारण्यात येत असलेल्या इमारतीचे बांधकाम परवाना व नकाशाची पडताळणी करून बांधकाम तात्काळ थांबविणे आणि संबंधितांना अटक करणे, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

निवेदन देताना विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान, हिंदू जनजागृती समिती, राष्ट्रीय बजरंग दल, हिंदू हुंकार संघटना, राष्ट्रीय श्रीराम सेना, जय बाबारी मित्रपरिवार, गोड ब्राह्मण नवयुवक मंडळ, महाराष्ट्र मंदिर महासंघ, हिंदू क्रांती सेना, हिंदू युवा वाहिनी यांसह अनेक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

